## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६९/२०१९ नि. क्र.०३ खालील आदेश

## (CNR No. MHNS160002982019)

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने अंतरीम लाभ मिळण्यासाठी कौंटुबिक हिंसाचार कायदा, कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. गैरअर्जदारांनी निशाणी क्र.१६ अन्वये जबाब दाखल केला.

०३. अर्ज व जबाबाचे सुक्ष्म वाचन केले.

०४. अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.व्ही.एस.पाटील व गैरअर्जदारांतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.आर.सोनवणे, यांचा युक्तीवाद श्रवण केला.

०५. उभयपक्षांच्या कथनावरुन खालील मुददे माझे अवलोकनार्थ येउन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेवरुन दिले ते खालील प्रमाणे:

| अ.कं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदाराने प्रथमदर्शी असे सिध्द केले आहे काय की, त्या पिडीत व्यक्ती आहे ? | होकारार्थी. |
| ०२ | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशतः होकारार्थी |
| ०३ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### :: कारणमिमांसा ::

### मुद्दा क्रं. १ :

०६. अर्ज व त्यावरील गैरअर्जदारांचा जबाब वाचला. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला. उभयपक्षातील नातेसंबंधाबाबत वाद नाही.

०७. अर्जदाराने असे कथन केले आहे की, त्यांचा विवाह गैरजअर्जदार क्रमांक १ यांचे सोबत दिनांक २९.०४.२००७ रोजी जाती–रिवाजा प्रमाणे संपन्न झाला व त्यांच्यातील पती–पत्नी हे नाते आजही कायम आहे. लग्नानंतर अर्जदार, गैरअर्जदार यांच्याकडे एकत्र कुटुंबात नांदावयास गेल्या असता, सुरुवातीचे तीन–चार वर्षे गैरअर्जदारांनी त्यांना ब–यापैकी वागविले. त्यानंतर, गैरअर्जदारांनी किरकोळ कारणांवरुन तसेच, लग्नात हुंडा कमी दिला, या कारणांवरुन व घर घेण्यासाठी रुपये २,००,०००/–ची मागणी करुन सदर मागणीच्या पुर्ततेसाठी गैरअर्जदारांनी त्यांचा शारीरीक व मानसीक छळ केला. तसेच, गैरअर्जदारांनी अर्जदारास मुल बाळ होत नाही, या कारणावरुन देखील त्रास दिला. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा त्यांच्या चारित्र्यावर संशय घेवुन त्यांना मारहाण करीत होता. त्यानंतर, दिनांक १५.०१.२०१७ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने चारित्र्यावर संशय घेवुन दारुच्या नशेत मारहाण करुन त्यांना घराबाहेर हाकलुन दिले. तेंव्हापासुन अर्जदार माहेरी राहत आहे.

०८. गैरअर्जदारांनी नि.१६ अन्वये त्यांचा जबाब दाखल करुन अर्जदारांशी असलेले नातेसंबंध मान्य केले परंतु, अर्जातील इतर आरोप स्पष्टपणे फेटाळले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार संशयी वृत्तीचे असुन विनाकारण सर्व गैरअर्जदारांशी वाद घालत असे. अर्जदारास मुल होत नसल्याने गैरअर्जदारांनी वेळोवेळी डॉक्टरांकडे नेवुन त्यांची तपासणी केलेली आहे. असे असतांनाही अर्जदार गैरअर्जदार क्र.१ यांच्यावर खोटे आरोप करुन त्यांना क्रुरपणे वागणूक देत होती. अर्जदार ही एकुलती एक मुलगी असल्याने अर्जदारास नेहमी माहेरची ओढ असल्याने अर्जदार कोणालाही न विचारता वेळोवेळी माहेरी निघुन जात असे.

०९. गैरअर्जदारांनी पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराने नकार दिला असतांनाही अर्जदार शेतात कामास जात असे व त्यातुन अर्जदाराचा स्वभाव स्वच्छंदी झाला. अर्जदारास वेळोवेळी समजावुन देखील अर्जदाराच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही, उलट, अर्जदाराने गैरअर्जदारास शिवीगाळ करुन जिवे

मारण्याची धमकी दिली.

१०. गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदाराची, गैरअर्जदार क्र.१ सोबत संसार करण्याची इच्छा नसल्याने दिनांक २५.०२.२०१७ रोजी विधीज्ञांमार्फत लेखी सुचना देवुन संमतीने घटस्फोटासाठी नासिक न्यायालयात हजर राहण्याचे कळविले. असे असतांनाही अर्जदाराने हिंदु विवाह अर्ज क्र. ३०८/२०१७ हा विवाह संबंध पुर्नप्रस्थापीत करण्यासाठी खोटा अर्ज दाखल केला. सदर अर्जाचे काम न्यायप्रविष्ट आहे. अर्जदाराने जाणीवपुर्वक वेळोवेळी विसंगत भुमिका घेवुन प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

११. अर्ज, जबाब तसेच उभयपक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद लक्षात घेता प्रथमदर्शनी उभयपक्षातील नाते संबंधाबाबत कोणताही वाद नाही. अर्जदाराच्या कथनान्वये गैरअर्जदार हे लग्नात हुंडा कमी दिला, मानपान दिला नाही तसेच, किरकोळ घरगुती कारणांवरुन व २,००,०००/– रुपयांच्या बेकायदेशीर मागणीच्या पुर्ततेसाठी त्यांचा शारीरीक व मानसीक छळ केला. गैरअर्जदारांनी सदर आरोप स्पष्टपणे फेटाळले आहेत व असे कथन केले आहे की, अर्जदाराने स्वच्छेने गैरअर्जदार क्र.१ यांचा त्याग केला आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारावर कोणत्याही प्रकारे कौटुंबीक हिंसाचार केलेला नाही. याउलट, अर्जदारानेच गैरअर्जदार क्र.१ याचा छळ करुन स्वच्छेने माहेरी राहत आहे. जरी, उपरोक्त परस्पर भिन्न कथने ही पुराव्यांती शाबीत होणार असली तरी, भारतीय संस्कृतीनुसार कोणतीही स्त्रीस त्रास असल्या शिवाय आपल्या पती व त्यांच्या नातेवाईकां विरुध्द विनाकारण आरोप करणार नाही. तसेच, गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी जबाबामध्ये अर्जदारावर बरेच आरोप केलेले आहेत. सदर आरोपांच्या पृष्ठयर्थ गैरअर्जदारांनी प्रथमदर्शनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे, सदरचे आरोप देखील प्रथमदर्शनी कौटुंबीक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडणारी आहेत.

१२. गैरअर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. सोनवणे यांनी जबाबातील कथने व

दिनांक २५.०२.२०१७ च्या सुचनेच्या अनुशंगाने असा युक्तीवाद केला की, अर्जदाराची गैरअर्जदारासोबत संसार करण्याची इच्छा नाही. तसेच, उभयपक्षातील वादाचे मुळ कारण हे अर्जदारास अपत्य होत नाही, हे आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कोणत्याही प्रकारे छळ केलेला नाही. विद्वान विधीज्ञांच्या उपरोक्त कथनांच्या अनुशंगाने दप्तरी दाखल केलेल्या अर्जदाराने विद्वान विधीज्ञांमार्फत दिलेल्या सुचनेचे अवलोकन केले असता, त्यामध्ये जरी, संमतीने घटस्फोट घेण्याबाबात उल्लेख करण्यात आलेला असला तरी, प्रकरणाच्या सध्यस्थीतीत केवळ सदर बाबींवर विसंबुन राहुन अर्जदाराने गैरअर्जदाराचा स्वच्छेने त्याग केला आहे, असा निष्कर्ष काढणे विधीसंगत होणार नाही. तसेच, प्रथम दर्शनी असेही दिसुन येते की, अर्जदाराने विवाह संबंध पुर्नप्रस्थापित होण्यासाठी मा. निफाड न्यायालयात अर्ज दाखल केला असुन तो न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे, असा निष्कर्ष काढणे विधीसंगत होणार नाही की, अर्जदाराची, गैरअर्जदारासोबत संसार करण्याची इच्छा नाही.

१३. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५, कलम ३ मध्ये दिलेल्या व्याख्या लक्षात घेता, तसेच सदर कायद्याचे ध्येय व कारणांचा विचार करता, जरी परस्पर भिन्न कथने हे पुराव्या अंतीच शाबीत होणार असली तरी, गैरअर्जदारांनी त्याच्या जबाबात केलेले आरोप लक्षात घेता, प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदारावर कौटुंबीक हिंसाचार झालेला आहे. एकंदरीत उभयपक्षांच्या कथनांचे विवेचन करता, अर्जदाराने प्रथमदर्शनी दप्तरी त्या पिडीत व्यक्ती असल्याचे शाबीत केले आहे. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे.

<u>मुददा क्रमांक २ व ३</u> –

१४. अर्जदाराने असे कथन केले आहे की, मुख्य अर्जाचा निकाल लागण्यास अवधी लागणार आहे. त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदाराने त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. गैरअर्जदारांकडे उत्पन्नाचे साधन असल्याने रुपये ५,०००/– प्रति महिना अंतरीम पोटगी मंजुर

होण्यास विनंती केली आहे.

१५. गैरअर्जरांनी असे कथन केले आहे की, अर्जदाराने त्यांच्या उत्पन्नाबाबत चुकीची व खोटी माहिती दिली आहे. याउलट, अर्जदाराच्या त्रासामुळे गैरअर्जदार क्र.१ यांच्या मानसीक व शारीरीक क्षमतेवर परिणाम झाल्याने ते सतत आजारी असतात. तसेच, अपघातात त्यांचे कंबर मोडले आहे. करीता, अर्ज नामंजुर होण्यास विनंती केली आहे.

१६. मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षावरुन अर्जदारांनी प्रथमदर्शनी त्या पिडीत व्यक्ती असल्याचे शाबीत केलेले आहे. त्यामुळे, अर्जदार मागणी प्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे? अर्जदाराने, गैरअर्जदार क्र.१ यांच्या उत्पन्नाबाबत दप्तरी कोणताही दस्त सादर केलेला नाही. अर्जदार ह्या गैरअर्जदार क्र.१ यांची पत्नी असल्याने त्यांच्या पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांची आहे. जरी, गैरअर्जदाराने ते सतत आजारी असल्याचे व अपघातात त्यांचे कंबर मोडल्याचे कथन केले असले तरी, त्या अनुशंगाने प्रथमदर्शनी दप्तरी कोणताही दस्त सादर केलेला नाही. मुळ अर्जाचा निकाल होण्यास अवधी लागणार असल्याने, अर्जदारास कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५, कलम २३ अन्वये अंतरिम आर्थिक सहाय्याचा आदेश त्यांच्या लाभात करणे न्यायोचित होईल.

१७. सदर कायद्याचे कलम २३ अन्वये या न्यायालयास अंतरिम किंवा एकतर्फा आदेश देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. उपरोक्त विवेचणांवरून अर्जदारांना आर्थिक सहाय्य करण्याची गैरअर्जदार क्र.१ यांची कायदेशिर व नैतिक जबाबदारी आहे. उभयपक्षांचे वय, त्यांचे राहणीमान व सध्याचे जीवनावश्यक वस्तुंचे बाजारभाव लक्षात घेता, अर्जदार यांना रुपये २,०००/- दरमहा अंतरीम आर्थिक सहाय्याचा हुकूम अर्ज दाखल दिनांक १५.०३.२०१९ पासुन मंजुर करणे न्यायोचित वाटते. परिणामी, मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी

देऊन, मुद्दा क्रं.३ च्या पृष्टयर्थ खालील प्रमाणे आदेश करीत आहेः

**– आ दे श –**

०१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्ज दाखल दिनांक १५.०३.२०१९ पासुन अर्जदार यांना २,०००/– रुपये दरमहा अंतरीम आर्थिक सहाय्य म्हणून मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपावेतो द्यावेत.

०३. सदर आदेशाची प्रत उभयपक्षांना कलम २४ अन्वये मोफत देण्यात यावी. तसेच आदेशाची प्रत संबंधीत पोलिस ठाण्यात पाठविण्यात यावी.

०४. खर्चाबाबत आदेश नाही.

Sunil Babasaheb Walke

Digitally signed by Sunil Babasaheb Walke
Date: 2020.01.13 13:50:20 +0530

दिनांक –१०.०१.२०२०
ठिकाण – चांदवड.

(सुनिल बा. वाळके)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
चांदवड.